**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

## मानसशास्त्रीय समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आजीवन अध्ययन विस्तार विभाग व विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांकरीता ऑनलाईन मानसशास्त्रीय समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

विद्यापीठ परीक्षा रोजगारा संदर्भात व भविष्याच्या संदर्भात त्यांना आपले प्रश्न कोणत्या व्यासपिठावर मांडावे व कोणाशी संवाद साधावा या बाबतीत नैराष्याच वातावरण निर्माण झाले होते. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे हेल्पलाइन म्हणून टेलीफोनीक किंवा मोबाइल द्वारा संवाद साधण्याकरीता लाइफलाइन नावाने हेल्पलाइन सुरू करण्यात आली. परंतू ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना कळविण्याचे साधणे तोडकी पडल्यामुळे ग्रामिण व शहरी भागातील शिक्षकांकरीता मानसशास्त्रीय समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करून प्रत्येक महविद्यालयातील एक शिक्षक हा त्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या व त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांना उत्तर देण्याकरीता शिक्षक हा समुपदेशन किंवा संवादाचे काम करेल अशी अपेक्षा या कार्यशाळेद्वारे करण्यात आली होती. म्हणून शहरी व ग्रामिण भागातील महाविद्यालयातील शिक्षकांना मानसशास्त्रीय समुपदेशन करण्याचे कार्य महाराष्ट्रातील विविध तज्ञ मंडळी जे या मानसशात्र व समुपदेशन विषयामध्ये तज्ञ म्हणून काम करतात. या मधे प्रामूख्याने मा. डॉ. विलास पाध्ये मुंबई, डॉ. मानसी राजहंस पुणे, डॉ. शफीक पठान अमरावती, डॉ. दत्तात्रय तापकीर सिल्वासा, पी.ए. वऱ्हाडपांडे नागपूर, प्रा. मेरूल गांधी मुंबई, डॉ. सुरेखा भाग्यवंत पुणे, डॉ.पंकज वसाडकर अमरावती यांचे शिक्षकांना मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी दशेत आढळणाऱ्या विविधांगी मनोशैक्षणिक समस्या व निवारण यंत्रणे अंतर्गत महाविद्याय स्तरावर संभाव्य आखणी सध्याच्या स्थितीत विद्यार्थी मंडळीची संभाव्य मनो आरोग्याची स्थिती, समुपदेशनातील समस्या परिहार स्वरूप आणि प्रारूप, समुपदेशक भूमिका कौशल्य, तंत्र, उद्देश्य संवादक या समोरील आव्हाने आणि नैतिक मुद्दे, संवादक या नात्याने विद्यार्थी मंडळींच्या समस्या हाताळतांना व्यक्तीगत/समुह पध्दतींचा वापर, समूपदेशन प्रक्रियेत मुलभूत मानसिक चाचण्यांचा उपयोग व विद्यार्थ्यांच्या प्रतिनीधीक स्वरूपाच्या समस्यांचे निवारण आदी महत्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन शुभा थत्ते आप.पि.एच. ठाणे चे फाउंडर ट्रस्टी व क्नीनिकल सुपरवाझर यांनी केले या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे सन्माननिय कुलगूरू डॉ. मुरलीधर चांदेकर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.

या कार्यशाळेला एकून ११०८ शिक्षकांनी नोंदणी केली यापैकी ८४० शिक्षकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग नोदविला परंतू ज्या दिवशी परीक्षा दिली व त्यापरीक्षेला उर्तीण झालेल्यांची संख्या ३६५ झाल्यामुळे याच शिक्षकांना प्रमाणपत्राचे पाटप ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

कार्यशाळेतील तज्ञ मंडळींचा प्रत्येक दिवशी परीचय करून देण्यात येत होता. या मध्ये प्रामुख्याने एम.ए समुपदेशन आणि मनोचिकीत्सा या अभ्यासक्रमाला शिकवीण्याऱ्या शिक्षीका प्रा. वनिता राऊत, प्रा.मंजूषा बारबूद्धे, प्रा.मनिषा लाकड, प्रा. पुजा काळे, प्रा.सविता सोनोने, प्रा.डॉ.पवन देशमुख, प्रा.सरेश पवार, प्रा.डॉ.प्रशांत भगत, यांनी करून दिला. कार्यशाळेतील प्रत्येक दिवसाचे तज्ञ समुपदेशक यांचे आभार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व डॉ. दिनेश कुमार सातंगे यांनी मानले. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांच्या मार्गदर्शनात व कार्यशाळेची तांत्रीक बाजू प्रा.डॉ.पवन देशमुख, प्रा.श्रीकांत देशमुख, श्री. सचिन निचळे, प्रा.विनित खारकर यांनी सांभाळली. या कार्यशाळेच्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयात एक समुपदेशक निर्माण होईल व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी यावर संवादाद्वारे निरसण होईल अशी अपेक्षा समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष संत गाडगे बाबा विद्यापिठाचे सन्मा.प्र.कुलगूरू डॉ. राजेश जयपुरकर यांनी व्यक्त केले.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. १६/०७/२०२०.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 64